## महिला उद्योजकतेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण

**डॉ. अरूणा एस. थुल ( देवगडे )**
एस. जी. बी. महिला महाविद्यालय
तुमसर जि. भंडारा

---

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भुमिका पार पाडत महिला समाजाचा आधारस्तंभ बनल्या आहेत. कधी प्रेमळ कन्या, तर कधी वात्सल्यपूर्ण माता, तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अत्यंत कुशलतेने आणि कोमलतेने व सहजतेने त्या निभावत आहेत. मानव समुहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. असे असले तरी जगाच्या पाठीवर बऱ्याच ठिकाणी समाजाकडून त्यांच्याकडे दुर्लक्ष होतांना दिसते. स्त्रियांशी हतोत्साहित करणारे वर्तन, त्यांचा जिवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ मोठया प्रमाणात सामाजिक असमानता, आर्थिक पराव– लंबित्व आणि अन्य सामाजिक अत्याचाराला बळी पडतात. अनेक प्रकारे हिनत्वाची वागणूक स्त्रीजातीला मिळत राहिली आहे. अनादी काळापासून महिलांवरील हे बंधने त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायीक विकासाच्या आड येत आहेत. हा भेदभाव दूर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि त्याचे सुचालन करणे आणि लैगिंक समतेद्वारे समाजाचे संतुलन साधणे यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोण, केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे स्त्री सक्षमीकरण असे म्हणता येईल.

मानवी हक्कांविषयी अनेक आंतरराष्टीय करारात मान्यता मिळूनही स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण अधिक आहे. वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरूषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. त्या पुरूषांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या सक्रीय असण्याची शक्यता फारच कमी आहे आणि त्या घरगुती हिंसाचाराला बळी होण्याची शक्यता खुपच मोठी आहे. त्या करिता कायदे व कल्याण कार्यक्रमाच्या माध्यमातुन आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रामध्ये महिलांना पुरूषांच्याबरोबरीने हक्क व दर्जा प्रदान करून देणे, विकासाची संधी उपलब्ध करूण देने आणि स्त्री–पुरूष असमानता नष्ट करणे या प्रक्रियेला 'स्त्री सक्षमीकरण' असे म्हणतात.

याकरिता स्त्रियांची मानसिकता बदलणे फार महत्वाचे आहे. ग्रामिण भागात स्त्रिया अजुनही स्वत: निर्णय घेऊ शकत नाहीत. इथे त्या पुरूषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्यांची निर्णयक्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत. याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे, प्रबोधन झाले पाहिजे. ती अजुनही १००टक्के सक्षम आहे हे मान्य करू शकत नाही. यासाठी जीवनात प्रगती करण्याचे शिक्षण हे एक प्रभावी माध्यम आहे. महिलांची प्रगती आणि सक्षमीकरणासाठी शिक्षणापेक्षा जास्त परीणामकारक काय असू शकते. या शिक्षणामुळे महिला आता सर्व समस्यांवर मात करत आपले कौशल्य, आत्मविश्वास आणि उपयोगितेबाबतीत अग्रेसर होतांना दिसतात.

**महिला धोरणाचा आढावा :**

जागतिक स्तरावर संयुक्त राष्ट्र संघाने (UNO) १९७५ हे वर्ष सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून जाहीर केले. भारत सरकारने महिलांच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी एक समिती गठीत केली. संयुक्त राष्ट्र संघाने १९७९ मध्ये महिलांची प्रगती वेगाने होण्यासाठी आंतरराष्ट्रीय संकेत तयार केले. त्याला

**सीडो** (Convention on the Elimination of all forms Discrimination Against women) म्हणतात. हा अत्यंत महत्वाचा दस्तऐवज मानला जातो.

महाराष्ट्र शासनाने १९९४ मध्ये पहिले महिला धोरण जाहिर केले. त्यात काल सुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१३ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले.

**उद्दीष्टे** :

या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने महाराष्ट्रातील महिलांचा सर्वांगिण विकास व सबलीकरणासाठी प्रागतीक दृष्टीकोण रूजविणे व पुरूषप्रधान मानसिकता बदलने व स्त्री आणि पुरूष यांचे परस्पर संबंध अधिक सौहार्दपुर्ण व निकोप व्हावे यासाठी प्रयत्न करणे, स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक धोरणात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भुमिका, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वयंसहायता बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार, शासकीय—निमशासकीय यंत्रनांमध्ये स्त्रियांना ३०टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थेत ५०टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामिण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण—प्रशिक्षणा च्या संधी उपलब्ध होतात. शासनामार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना राबविण्यात येत आहेत. महिलांना शिक्षित, सक्ष्यम आणि स्वयंपूर्ण बनविण्याचा या योजनांचा उद्देश आहे.

**महिला सक्षमीकरणाची पहिली पायरी :**

श्री श्री रवीशंकरजी म्हणतात ‘ सामाजिक असमानता, कौटुंबिक हिंसा ,अत्याचार आणि आर्थिक परावलंबित्व यातुन स्त्रियांची सुटका व्हायची असेल तर गरज आहे महिला सक्षमीकरणाची. प्रथम ‘आपण सक्षम आहोत’ याची खात्री बाळगणे गरजेचे आहे. आपण स्त्री आहोत या आत्मग्लानीमघे कधीही राहू नका. जेव्हा तुम्ही आत्मग्लानीमघे येता तेव्हा तुम्ही तुमची उर्जा, उत्साह, सामर्थ्य आणि आत्मविश्वास गमावता. आत्मग्लानी आणि अपराधी भावना दोन्ही मध्ये तुम्ही आपल्या मनाचा छोटेपणा अनुभवता. ज्यामुळे तुम्ही आपल्या आत्म्यापासून दुर जाता. स्वत:ला दोष देणे बंद करूण आपली स्तुती—कौतुक करणे सुरू करा. स्तुती करणे दैवी गुण आहे. मी अबला आहे, मी स्त्री आहे असा विचारसुद्धा करू नका. उभे रहा, तुमचे अधिकार प्राप्त करण्यासाठी गरजेचे सामर्थ्य तुमच्यामध्ये आहे.’ म्हणून आपला आत्मविश्वास वाढवा.

**आर्ट ऑफ लिव्हिंगच्या महिला सक्षमीकरण :—**

कार्यक्रमामुळे देशविदेशातील महिलांना आर्थिक स्वतंत्र बनविले आहे. ज्यामुळे त्या सामाजिक अन्यायाविरूद्ध उभ्या ठाकल्या आहेत. महिलांना समाजात सन्मान प्राप्त करून देण्यासाठी **आर्ट ऑफ लिव्हिंगने** समाजातील विविध स्तरावरीज महिलांना आत्मसंन्मान, अंतर्गत मजबूती आणि रचनात्मक विकासास कारणीभूत होतील असे महिला सक्षमीकरण कार्यक्रम सुरू केले आहेत. आर्ट ऑफ लिव्हिंगने शिक्षणाद्वारे देशातील कानाकोपऱ्यातील ग्रामिण मुली आणि महिलांना समान दर्जाने सक्षम बनविले आहे. आर्ट ऑफ लिव्हिंगच्या महिला सक्षमीकरण कार्यक्रमामुळे त्यांना एक व्यासपीठ प्राप्त झाले आहे. जेथुन प्रेरणा घेऊन त्या पिढ्यान्पिढयाची बंधने झुगारून सर्व क्षेत्रात समानता प्राप्त करू शकतील.

महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर व पुरोगामी राज्य म्हणून ओळखले जाते. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेव आंबेडकर, छत्रपती शाहू महाराज इत्यादी अनेक महापुरूषांनी आपल्या राज्यातुनच सामाजिक क्रांतीची सुरूवात केली. महिलांच्या शिक्षणाची सुरूवात फुले दाम्पत्यानी पुण्यातुनच केली. त्यावेळी त्यांना समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागले होते. पण तरीही सगळया प्रकारचा विरोध पत्करून त्यांनी स्त्री

शिक्षणाची चळवळ चालू ठेवली. त्याचेच फलस्वरूप म्हणून आज सर्व क्षेत्रात महिला आघाडीवर असल्याचे आपणास दिसते.

महाराष्ट्राने पुढील काळातही सामाजिक कार्याचा वारसा जपला. आज आपण बघत आहोत की महाराष्ट्रात स्त्री शिक्षणाचे तसेच वेगवेगळया क्षेत्रात स्त्रियांच्या सहभागाचे प्रमाण लक्षणीय आहे. महाराष्ट्राने स्त्रियांचे राजकीय क्षेत्रातील प्रमाण वाढावें यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्येही त्यांना आरक्षण दिले आहे. शिवाय शासकीय नौकऱ्यांमध्येही महिलांना आरक्षण देणारे महाराष्ट्र हे एक अग्रणी राज्य ठरले आहे. याशिवाय राज्य शासनाने महिलांच्या सक्षमीकरणाच्या उद्देशाने वेगळा महिला आणि बालविकास विभाग स्थापण केला असून या विभागामार्फत अनेक योजना राबविल्या जात आहेत. इतर विभागाच्या योजनांमध्येही महिलांसाठी प्राधान्याचे स्थान दिले जात आहे.

**महिला आर्थिक सक्षमीकरण :**

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिक दृष्ट्या सक्षमीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजिवीकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्धव्यवसाय, इ. क्षेत्रात काम करत असतात. परंतू त्याकामाची कधीच मोजमाप केली जात नाही. त्यामुळे आर्थिक सक्षमीकरणाला चालना मिळत नाही.

महिलांच्या विकासाकरिता सरकारच्या अनेक योजना असून त्याबाबत ग्रामपातळीवर जनजागृती गरजेची आहे. महिला आता प्रत्येक क्षेत्रात प्रगतीकडे वाटचाल करत असून महिला सक्षमीकरण ही काळाची गरज आहे.

**महिला सक्षमीकरणाच्या योजना :— महिला, मुलींसाठी योजना**

१. बेटी बचाओ, बेटी पढाओ
२. महिला आणि बालविकास विभागाच्या योजना
३. मनोधैर्य योजना
४. माझी कन्या भाग्यश्री
५. जिजाऊ वसतीगृह
६. अल्पसंख्यांक मुलींसाठी वसतीगृहे
७. सामाजिक न्याय विभागाच्या योजना

**महिला नवउद्योजकांसाठी भारत सरकारच्या ९ खास योजना :**

अलिकडच्या काळात महिला सक्षमीकरणाचे वारे वेगाने वाहते आहे. स्त्रिया देखिल चाकोरीबाहेर पडून स्वत:ला सिद्ध करून यशाचे एकएक शिखर गाठत आहे.प्रत्येक आवाहनावर मात करून स्वत:ला सक्षम बनविण्याकडे त्यांचा जास्त कल दिसून येतो. त्यातल्या त्यात महत्वाचे म्हणजे तिला घरून याकरिता पाठिंबा मिळतो आहे. हे चित्र फार आश्वासक आहे. शिवाय आणखी एक कौतुकास्पद गोष्ट म्हणजे आता महिलांच्या ह्या प्रगतीच्या वाटचालीत महिलांना आणखी सशक्त करण्यासाठी भारत सरकारने अनेक पावले उचलली आहेत. त्यातलेच एक महत्वाचे पाऊल म्हणजे खास महिलांना डोळयासमोर ठेऊन विविध योजना आखल्या आहेत आणि एवढयावरच न थांबता त्या योजना नीट राबवल्याही जात आहेत. त्यामुळे महिलांना आपली प्रतिभा दाखवण्याची आणि आपली ओळख निर्माण करण्यासाठी मोलाची मदत झाली आहे.

भारतातील स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये महिला उद्योजक सर्वत्र दिसू लागल्या आहेत. घरांच्या चार भिंतीतून बाहे पडून भारतातील उद्योगक्षेत्रात सामील होतांना दिसून येते. ह्याचे सर्वात मोठे आणि महत्वाचे कारण म्हणजे विविध बॅंका महिला उद्योजकांना देत असलेले भांडवल. बॅंकेकडून खास महिलांसाठी अशा विशेष कर्जयोजना आहेत ज्यात तारण, व्याजदर इ. बाबतीत अटी व शर्ती थोडया शिथिल आणि लवचिक ठेवण्यात आलेल्या आहेत.

१. मुद्रा योजना
२. ट्रेड योजना (व्यापार संबंधित उद्योजकता सहाय आणि विकास)
३. महिला आणि निधि योजना
४. अन्नपुर्णा योजना
५. महिला उद्योजकांसाठी स्त्रीशक्ती पॅकेज
६. भारतीय महिला व्यवसाय बॅंक कर्जयोजना
७. देनाशक्ती योजना
८. उद्योगिनी योजना
९. सेंट कल्यानी योजना

इत्यादी भारतसरकारच्या काही महत्वाकांक्षी योजना ज्या खास महिलांसाठी तयार करण्यात आलेल्या आहेत आणि महिला सक्षमीकरणात मोलाचा वाटा उचलत आहेत.

या माध्यमातून मला एवढेच सांगायचे आहे की आठ मार्च जागतिक महिला दिन महिला सशक्तीकरण दिवस. आम्ही सशक्त तर आधिपासूनच होतो. आमची शक्ती, आमचे शौर्य, बुद्धी यांची प्रचिती सर्वांनाच आहे. स्त्री ही अनादीकाळापासून शक्ती स्वरूपात आहे. बदलत्या परीस्थितीत त्याची परिभाषा जरूर बदलली आहे.राक्षसाचा संहार असो वा आणखी कोणते कठिण काम स्त्री सर्वदाच अग्रणी आहे. महिला सशक्तीकरण हे आधुनिक नसून पौराणिक आहे.

बदलत्या परिस्थितीत मात्र स्त्रीची भुमिका बदलली आहे. ती मुलगी,सून, पत्नी,माता ह्या भुमिकाव्यतिरिक्त अधिकारी, वैज्ञानिक, शिक्षक, कर्मचारी, मालक, अशा अनेक रूपांनी दिसते. तिच्या जीवनाला अनेक पैलू लाभले आहेत. आणि त्यांना अधिक चमक तिने आपल्या कर्तृत्वाने दिली आहे. आपल्या बुद्धीला, आत्मसंमानाला तिने नविन दिशा दिली आहे. आजच्या जगात असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे स्त्री नाही. प्रत्येक क्षेत्रात पुरूषांच्या पुढे आहे. ह्या सर्व गोष्टींचा विचार केला तर असे वाटते की आम्हाला आमची जागा मिळाली आहे.पण माझ्या मते अजून आम्हाला बरेच प्रयत्न करायचे आहेत.

आज आपल्यापैकी अनेक डॉक्टर, इंजिनियर, शिक्षिका, नेता, अभिनेत्री, मंत्री देशाच्या सर्वोच्च पदांवरदेखिल आहेत.त्याचवेळी दुसरीकडे गावात अनेक स्त्रिया मुलांना जन्म देतांना मरतात.हुंडयाअभावी मरतात.पण त्यांना न्याय मिळत नाही.त्यांची बातमीही वर्तमानपत्रात झळकत नाही. त्यांच्या अधिकारासाठी आंदोलने होत नाही. ह्या प्रश्नांना सोडविण्यासाठी आंदोलनाचे रूप द्यावे लागेल. नाहीतर अनेक स्त्रियांचे अश्रु असेच वाहत राहतील. आपल्या सर्वांना एकच विनंती आहे की ''एकमेकां सहाय करू अवघे धरू सुपंथ''या विचाराची अंमलबजावणी करून आपल्या गरजू बहिणींना आधार देऊ तरच आजचा दिवस सार्थकी लागेल.

**संदर्भ :—**


१. इन्स्टिटयूशन्स,रिलेशन अॅन्ड आउटकम— रिव्हर्स रिआलिटी —नायला कबीर १९९९
२. रम्या सुब्रमन्यम — काली फॉर वुमेन—१९९९
३. नेव्हर डन पुअरली पेड — जयती घोष — २००९
४. विमेन अॅन्ड वर्क— पदमिनी स्वामीनाथन —२०१२
५. माहिती स्त्रोत— लेखक — इर्शाद बागवान —महान्युज, गुरूवार ३० एप्रिल २०१५
६. स्त्री सक्षमीकरणाच्या योजना —गौरव विधुलकर —लोकसत्ता ०१/०४/२०१७
७. महिला सक्षमीकरण काळाची गरज— लोकमत —११ मार्च २०१८
८. इन मराठी . कॉम